# शिक्षण विभाग प्राथमिक , पुणे महानगरपालिका ,

## जुना तोफखाना कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे ०५

## भरती जाहिरात

शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे महानगरपालिका संचलित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी तात्पुरत्या स्वरुपात एकवट मानधनावर प्राथमिक (अपदवीधर शिक्षक) व उच्च प्राथमिक (पदवीधर शिक्षक) करिता दरमहा करार पद्धतीने सहा महिने मुदतीसाठी हंगामी शिक्षकांची निवड, प्रतीक्षा यादी, शैक्षणिक, व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे करण्यात येणार आहे. खाली नमूद केलेली शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात वैयक्तिक माहितीचा अर्ज , प्रमाणपत्रकांच्या व गुणपत्रकांच्या प्रमाणित , छायांकित प्रती जोडून अर्ज शिक्षण विभाग प्राथमिक , पुणे महानगरपालिका, कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ येथे सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत हस्तपोहोच स्वीकारण्यात येतील. जाहिरात दिनांकापासून सात दिवसांपर्यंत (सुट्टीचे दिवस धरून) आलेल्या पूर्ण अर्जांचा विचार केला जाईल. मुदतीनंतर व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच पोस्टाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही.

**पदाचे नाव –**

**अ) प्राथमिक शिक्षक (अपदवीधर शिक्षक) - एकवट मानधनावर दरमहा र.रु.१०,०००/-**

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता -**

१) इयत्ता १ली ते १२ वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

२) इयत्ता १ली ते १० वी पर्यंत इंग्रजी, १२वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

३) इयत्ता १ली ते १०वी मराठी अथवा इतर माध्यमातून व १२वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

४) इयत्ता १ली ते १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

अ. वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना इंग्रजी माध्यमातून शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील. इंग्रजी माध्यमातून शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण उमेदवारांना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल. तद्नंतर इतर माध्यम शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

ब. तथापि शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उमेदवार उपलब्ध न झाल्यास वरील १ ते ४ च्या प्राधान्य क्रमांकानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. अटी, शर्ती शिथिल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

**एकूण पदे-**

| अ क्र | पद | पद संख्या |
|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षक | १०० |

**ब) उच्च प्राथमिक शिक्षक (पदवीधर शिक्षक) - एकवट मानधनावर दरमहा र.रु.११,०००/-**

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता –**

१) इयत्ता १ली ते पदवी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

२) इयत्ता १ली ते १२वी पर्यंत इंग्रजी, पदवी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड./बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

३) इयत्ता १ली ते १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून व पदवी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड./ बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

४) इयत्ता १ली ते पदवी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड./बी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

अ. वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना इंग्रजी माध्यमातून शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील. इंग्रजी माध्यमातून शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण उमेदवारांना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल. तद्नंतर इतर माध्यम शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

ब. तथापि शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उमेदवार उपलब्ध न झाल्यास वरील १ ते ४ च्या प्राधान्य क्रमांकानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. अटी, शर्ती शिथिल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

**पद संख्या -**

| अ क्र | पदवीधर शिक्षक विषय | पद संख्या |
|---|---|---|
| १ | गणित/ विज्ञान | ३० |
| २ | मराठी/हिंदी/इंग्रजी | ३० |
| ३ | सामाजिक शास्त्र | ३० |

**आरक्षण तक्ता – प्राथमिक शिक्षक अपदवीधर शिक्षक / उच्च प्राथमिक पदवीधर शिक्षक**

| अजा | अ ज | विजा अ | भजब | भजक | भज ड | विमा प्र | इमाव | एस.ई.बी.सी | ई डब्लू एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३% | ७ % | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १६% | १०% | २२% | १००% |
| २५ | १३ | ६ | ५ | ७ | ४ | ३ | ३६ | ३० | १९ | ४२ | १९० |

वरील आरक्षणात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्राप्त व पात्र उमेदवारानुसार जागांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

**अटी व शर्ती -**

- वयोमर्यादा दिनांक ३१/०५/२०१९ रोजी सर्वसाधारण व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनुक्रमे कमाल ३८ व ४३ वर्षापर्यंत राहील
- आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता विहित केल्यानुसार असणे आवश्यक आहे. गुणवत्ता धारक अर्जदाराचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. अर्ज करताना उमेदवाराने

जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची अथवा शाळांत परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

- अर्जासोबत उमेदवारांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता , जातीचा दाखल इ. आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती जोडण्यात याव्यात. सत्य प्रती जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
- महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
- सदर नेमुणूक कालावधी सहा महिने करिता किंवा त्यापूर्वी संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांचा राहील. या पदावर उमेदवारास शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे मनपा सेवेत हक्क मागता येणार नाही.
- शासकीय वा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे वा प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील
- यापूर्वी शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे मनपा कडे शाळेमध्ये काम केलेल्या करार पद्धतीवरील शिक्षकांचे काम असमाधानकारक असल्यास अशा उमेदवारांचा अर्ज अपात्र करणेचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.
- अर्जदाराने आपले अर्ज शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे मनपाने जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.
- अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक नसल्याचे आढळून आल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल. तसेच नियुक्त झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.
- उमेदवारांनी मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी देणे अनिवार्य आहे.
- वेळेअभावी पत्र वा सूचना पाठविणेकमी मोबाईल, एसएमएसचा वापर कण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-
(सौरभ राव)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका, पुणे

## अर्जाचा नमुना

मा.प्रशासकीय अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सादर....

| अर्जदाराचा अलीकडे काढलेला आयकार्ड आकाराचा रंगीत फोटो स्वयंसाक्षांकित |
|---|

**विषय :- शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळांमध्ये सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता सहा महिने कालावधीसाठी एकवट मानधनावर करार पद्धतीने अपदवीधर / पदवीधर शिक्षक पदासाठी अर्ज**

महोदय,

१) अर्जदाराचे नाव : (मराठी)...........................................................................
इंग्रजी : (कॅपिटल मध्ये)..............................................................................
२) कायम राहण्याचा पत्ता : ..........................................................................
३) दूरध्वनी/ मोबाईल नं : ......................................................... (अनिवार्य)
४) ईमेल आयडी : ......................................................... (अनिवार्य)
५) जात : ..................... प्रवर्ग : ................................
६) जन्मतारीख (DD/MM/YYYY) संपूर्ण
७) वय (दिनांक ३१/०५/२०१९ रोजी) वर्ष : ........... महिने ............

| अ. क्र. | शैक्षणिक/ व्यावसायिक पात्रता | माध्यम | बोर्ड/राज्य | उत्तीर्ण दिनांक | किती पैकी | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | | | | |
| २ | एच.एस.सी. | | | | | | |
| ३ | पदवी | | | | | | |
| ४ | डी.एड./डी. टी. एड./बी.एड. | | | | | | |
| ५ | टी. ई. टी. / सी. टी. ई. टी. | | | | | | |
| ६ | अभियोग्यता चाचणी | | | | | | |

अर्जासोबत माझ्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता , गुणपत्रके व इतर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडलेल्या आहेत. माझी सर्व माहिती ही सत्य व अचूक आहे. नियुक्तीसाठी जाहिरातीमधील विहित अटी व शर्ती मला मान्य आहेत. तरी माझी एकवट मानधनावर करार पद्धतीने सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी सहा महिने कालावधीसाठी शिक्षक या पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

आपला / आपली विश्वासू
अर्जदाराची सही (अर्जदाराचे संपूर्ण नाव)